**हदगाव, जि.नांदेड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालय स्थापन करणे व त्यानुषंगाने पदे मंजूर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः न्यायस्था २०२६/ प्र.क्र. ०९/कार्या-१२,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २४ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१ प्रबंधक (निरीक्षणे १), मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्रमांक बी (डब्ल्यू) ए १२१५ / १९८१/३०६१/५२२०१, दि. १७.१२.२०२५

२ जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांचे पत्र क्र.ADM/९०८९/२०२५, दि.१९.०८.२०२५

३ वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क., दि.२७.०४.२०२२

४ विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.एचसीटी १२२२/८३८/प्र.क्र.१४३/का-३, दि.०६.०२.२०२४ व शुध्दीपत्रक दि.१०.१०.२०२४

प्रस्तावना :-

न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या, न्यायालयासाठी इमारत/न्यायदान कक्ष व न्यायाधीशांसाठी निवासस्थान यांची उपलब्धता ह्या बाबी विचारात घेऊन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या स्तरावरील "नवीन न्यायालय स्थापना समिती" कडून राज्यात नवीन न्यायालय स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. सदर प्रकरणी उक्त निकष पूर्ण होत असल्याने मा.उच्च न्यायालयाच्या "नवीन न्यायालय स्थापना समितीने" हदगाव, जि.नांदेड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास वाचा येथील अ. क्र.१ अन्वये तत्वत: मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने हदगाव, जि.नांदेड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्याची व त्यासाठी पदे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

हदगाव, जि.नांदेड येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच जिल्हा सरकारी वकील कार्यालय स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच या न्यायालयासाठी संदर्भ क्र.४येथील शासन निर्णय व शुध्दीपत्रकान्वये मंजूर केलेल्या न्यायीक अधिकाऱ्यांच्या २८६३ नियमित पदांमधून तसेच ११०६४ सहाय्यभूत कर्मचाऱ्यांच्या नियमित पदांमधून पुढील तक्त्यात दर्शविण्यात आलेली नियमित पदे घेण्यास तसेच ५८०३ मनुष्यबळांच्या मर्यादेत बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेण्यास, सदर न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून मान्यता देण्यात येत आहे.

## जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय,  हदगाव, जि.नांदेड

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पदाची वेतनश्रेणी** | **पदांची संख्या** | **सेवेचा प्रकार** |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश | Pay in Judiciary Services | १ | नियमित |
| २ | अधिक्षक | एस १६: ४४९००-१४२४०० | १ | नियमित |
| ३ | लघुलेखक ग्रेड-१ | एस १७ : ४७६००-१५११०० | १ | नियमित |
| ४ | वरिष्ठ लिपिक | एस ८: २५५००-८११०० | ४ | नियमित |
| ५ | कनिष्ठ लिपिक | एस ६: १९९००-६३२०० | ९ | नियमित |
| ६ | बेलिफ | एस ६: १९९००-६३२०० | ३ | नियमित |
| ७ | पुस्तक बांधणीकार | - | १ | बाह्ययंत्रणेद्वारे |
| ८ | शिपाई | - | २ | बाह्ययंत्रणेद्वारे |
| ९ | पहारेकरी | - | १ | बाह्ययंत्रणेद्वारे |
| १० | सफाईगार | - | १ | बाह्ययंत्रणेद्वारे |
| ११ | वाहनचालक | - | १ | बाह्ययंत्रणेद्वारे |
| | **एकूण पदे (१९ नियमित व ६ बाह्ययंत्रणेद्वारे)** | | **२५** | |

## सरकारी वकील कार्यालय, हदगाव, जि.नांदेड

| अ.क्र. | पदनाम | पदाची वेतनश्रेणी | पदांची संख्या | सेवेचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | लघुलेखक (ग्रेड-३) | एस १४: ३८६००-१२२८०० | १ | नियमित |
| २ | वरिष्ठ लिपिक | एस ८: २५५००-८११०० | १ | नियमित |
| ३ | कनिष्ठ लिपिक | एस ६: १९९००-६३२०० | १ | नियमित |
| ४ | शिपाई | - | १ | बाह्ययंत्रणेद्वारे |
| | **एकूण** | | ४ | |

२. बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दि. २७/४/२०२२ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता संबंधित न्यायालयाने घ्यावी.

३. वाहनचालक, पुस्तकबांधणीकार, शिपाई, पहारेकरी व सफाईगार या गट "ड" संवर्गातील सेवा बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. त्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्यात यावे.

४. उपरोक्त मंजूर करण्यात आलेली नियमित पदे ही अस्थायी स्वरुपाची असतील. सदर पदे ही भरण्यात आलेल्या दिनांकापासून प्रथमत: दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत चालू ठेवण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यात येत असून, सदर अस्थायी पदांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ नंतर मुदतवाढ घेणे आवश्यक राहील.

५. या प्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्रमांक जे-१, २०१४- न्यायदान (१०५) जिल्हा व सत्र न्यायालये (०२), जिल्हा व सत्र न्यायाधीश (०२)(०१), जिल्हा व सत्र न्यायाधीश (२०१४ ०१७२) दत्तमत (अनिवार्य ) " या लेखाशीर्षाखाली संबंधित वर्षात विहित पध्दतीने निधी अर्थसंकल्पित करुन खर्ची टाकण्यात यावा. या अनुषंगाने निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

६. सदर शासन निर्णय, मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक११.०८.२०२६रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५९१अ/२०२६/व्यय-१०, दिनांक २७.७.२०२६ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४१४४६२५५३१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS V GAIKWAD

Digitally signed by VILAS V GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=64F5AB9E019C90AD5DB684984DF113ED09062245CB9E042BE5B12E5AA482FC17, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CD7BB8BAA2D72280DD453A12422482D4768A126C83ECB44E84A8186EED4352A0, cn=VILAS V GAIKWAD
Date: 2026.08.24 14:47:31 +05'30'

**( विलास वसंत गायकवाड )**
**विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२.मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३.मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४.मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५.मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु, क्री. व यु. क., अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ ) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
९. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास,गृह निर्माण) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
१०.मा.सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,
११. मा.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२.मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१३.मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय मुंबई, (पत्राने)
१४.प्रबंधक (निरीक्षण-१), मा.उच्च न्यायालय, मुंबई. (पत्राने)

१५.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड.
१६.सह संचालक, न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था, उत्तन / नागपूर,
१७.महालेखापाल १, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई,
१८.महालेखापाल २, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) नागपूर,
१९.जिल्हा कोषागार अधिकारी, जि.नांदेड,
२०.उप जिल्हा कोषागार अधिकारी, हदगाव, जि.नांदेड,
२१. वित्त विभाग, कार्यासन-व्यय ५/आ.पु.क./सेवा ९, मंत्रालय, मुंबई,
२२.विधि व न्याय विभाग कार्यासन -३,११,१३,२०,२३ व२४ मंत्रालय, मुंबई.
२३.निवडनस्ती.